
# Visual MELODY


E-Magazine about Visual Arts in free India
By: RAVI PARANJAPE FOUNDATION FOR ART

**Volume 2 - Quarterly Issue 1 - December 10, 2020**



## COVER STORY
Eminent Indian Painter
**Shri. Gopalrao Deuskar**

All paintings and illustrations used in this issue are duly acknowledged.
Image courtesy Nehru Center Catalogue and Chitrakar Gopal Deuskar - Kalawant and Manus by Suhas Bahulkar (Rajhans Prakashan)



*A distinct 'Deuskar style'*

# चित्राच्या चौथ्या मितीचा जनक

- रवि परांजपे

चित्रकलेची समज असणे म्हणजे काय हो ? माझ्या दृष्टीने चित्रकलेची समज असणे याचा अर्थ चित्रांतून उगम पावणाऱ्या दृक्‌सुगंधाची जाण असणे. अनेक जण चित्रकला शिकत असतात. चित्रेही काढत असतात. पण त्यापैकी या दृक्‌सुगंधाची ओळख, चित्रसुगंधाची ओळख किती जाणांना झालेली असते ? फार जणांना ती होत नसावी. कारण दृक्‌सुगंधाची जाण असणारे व तो आपल्या चित्रातून रसिकांपर्यंत पोचवू शकणारे कलावंत अत्यंत अभावानेच सापडतात. बरे, चित्रकला शिकणाऱ्या प्रत्येकाला ही दृक्‌सुगंधाची जाण यावी तरी कशी ? कारण फुलांच्या सुगंधाप्रमाणेच याही सुगंधाला ना असतो रंग, ना असते रूप. तेव्हा चित्रकला शिकणाऱ्यांना जेथे या दृक्‌सुगंधाची जाण होण्यात अडचणी येतात तेथे सामान्यांची काय कथा ?

आणि म्हणूनच हा दृक्‌सुगंध निर्माण होण्याची प्रक्रिया समजावून घ्यावी लागते आणि समजावून सांगावी लागते. त्यासाठी ज्या चित्रकारांनी या दृक्‌सुगंधाच्या संचितात स्वतःची भर घातली त्या चित्रकारांचे पुनःस्मरण करणे अगत्याचे ठरते. त्यांच्या चित्रांकडे पुन्हा पुन्हा मागे वळून पहाणे आवश्यक ठरते. या मागे वळून पहाण्यातच चित्रकलेच्या खऱ्या परंपरेची जाण येत जाते. ही जाण येताना समजते की परंपरा आणि रूढी यांमधे महत्वाचा फरक आहे. त्यांची गल्लत करता कामा नये. कारण परंपरा ही कलाकारांना पुढचा मार्ग दाखवत असते तर रूढी त्यांना अडकवून ठेवत असते.

दृक्‌सुगंधाच्या परंपरेची ओळख पटत असताना काही गोष्टी सांगव्याशा वाटत असतात. ही खरी परंपरा एकात्म आहे हे तर अलिकडील काळात काहीसे जोर देऊन सांगावेसे वाटत असते. वास्तववादी चित्रकला श्रेष्ठ का आधुनिक कला श्रेष्ठ असा वाद जरूर नसताना जो माजवला जातो त्यात चित्रकला क्षेत्राची एकात्मता भंग पावते, ही व्यथा सांगावीशी वाटत असते. बोधचित्रांना व बोधचित्रकारांना अभिजात चित्रकारांपेक्षा वेगळे मानून गौण स्थानावर ठेवणारे प्रागतिक जाणकार हे कलाक्षेत्रातील ’सांस्कृतिक जातीयतेला’ कसे खतपाणी घालतात हे पण सांगावेसे वाटत असते.

आणि सारे सांगण्याची संधी मला अगदी अलिकडच्या काळात मिळाली. पुण्याच्या ‘सकाळ’ या प्रसिद्ध वृत्तपत्राने ती दिली. १ जाने. १९९५ हा रविवार होता. त्या दिवशीचा ‘रविवार सकाळ’ जो बाहेर पडला तो ’शिखरे रंगरेषांची’ या माझ्या लेखमालेतील पहिले लेखपुष्प सोबत घेऊनच आणि नंतर दर आठवड्याला एक या प्रमाणे उर्वरित पंचवीस लेखपुष्पे या लेखमालेत गुंफली जाई पर्यंत जून ९५ ची अखेर उजाडली. या लेखमालेत आजपर्यंत मला अतिशय भावलेल्या ज्या सव्वीस परदेशी चित्रकारांवर मी लिहिले ते सारे जण होते. गेल्या शे-सव्वासे वर्षांतले सारे जण असे की ज्यांनी माझी दृक्‌सुगंधविषयक जाण वाढीस लावली. त्यामुळे त्यांच्याबद्दल ज्या वेळी मी या लेखमालेत लिहिले, ते या दृक्‌सुगंधाच्या जाणिवेतून. लिहिण्यासाठी जे वाचन केले ते पण याच जणिवेतून आणि या


G.D. Deuskar.
16

साऱ्या चित्रकारांची मुद्रित चित्रे पुन्हा नजरे खालून घातली ती पण या दृक्‌सुगंधाच्या पुनर्नुभवाला सोबतीला घेऊनच. त्यामुळे या दृक्‌सुगंधाच्या विविध जातकुळींच्या कुप्या माझ्या अवतीभवती खुलाव्यात असेच काहीसे माझ्या लेखामालेच्या सहा महिन्यांत घडत होते.

या दृक्‌आनंद देणाऱ्या चित्र-सुगंधाच्या दरवळात मश्गूल होताना माझ्या जुन्या स्मृती पण चाळवल्या गेल्या होत्या. माझे आजवरचे तीन परदेशप्रवास आठवले होते. त्यावेळी तहानभुकेचा विचार न करता तासन्‌ तास घालवून मी पहिलेली या प्रवासातील व्हिएन्ना, पॅरिस ॲम्स्टरडॅम, लंडन, न्यूयॉर्क, फिलाडेल्फिया, वॉशिंग्टन, बफेलो डीट्रॉईट आणि टोरँटो या शहरांतील चित्रसंग्रहालये मला आठवत होती आणि या साऱ्या चित्रसंग्रहालयांतील माझ्या आवडत्या चित्रकारांच्या मूळ चित्रकृती प्रत्यक्ष पाहाताना प्रथमच त्या अलौकिक दृक्‌सुगंधाच्या विविध जातकुळींचा दरवळ मला खूपखूप सुखावून गेल्याचेही मला स्मरत होते.

जून ९५ च्या अखेरीस ही लेखमाला संपल्यानंतर गेले चार महिने या लेखमालेचा जो बोलबाल झाला त्यामुळे हे चालू वर्ष म्हणजे 'दृक्‌सुगंधाच्या पुनर्नुभवाचे वर्ष' असे मी मानू लागलो. या वर्षातले पहिले सहा महिने लेखनात घालवल्यानंतर उरणाऱ्या सहा महिन्यांत आता पूर्ण लेखन संन्यास घेऊन स्वतःच्या चित्रनिर्मितीवर लक्ष केंद्रित करावे असा माझा मानस होता. परंतु अशी वेळापत्रके माणसांनी ठरवली तरी नियतीने त्यावर शिक्कामोर्तब केल्याखेरीज काहीच खरे ठरत नसते हे मला लवकरच समजणार होते.

कारण, परवा म्हणजे दृक्‌सुगंधाच्या पुनर्नुभवाचे हे माझे वर्ष संपण्यास केवळ दोनच महिने उरलेले असताना नियतीचा निर्णायक हस्तक्षेप घडून आला आणि माझ्या लेखनसंन्यासाच्या मनसुब्याचे तीन तेरा वाजत असतानाच लेखणी पुन्हा हाती आली. नियती आता जणू मला बजावू पहात होती: "एका तरी भारतीय चित्रकारावर आता लिहिल्याखेरीज तुझे हे दृक्रसुगंधाच्या पुनर्नुभवाचे वर्ष मी संपू देणार नाही".

झाले असे की केवळ योगायोगाने ख्यातनाम चित्रकार कै. गोपाळ देऊस्करांची काही अभ्यासचित्रे पंधरा-वीस दिवसांच्या सांभाळासाठी माझ्या स्टुडिओत ठेवली जाण्याचे भाग्य मला लाभले. या अभ्यासचित्रांत काही रेखाटने होती तर काही व्यक्तिचित्रे. मुंबईचे 'जे.जे. स्कूल ऑफ आर्ट', लंडन येथील 'रॉयल ॲकडॅमी' व युरोपातील इतर कलाशिक्षण संस्था यांमधील चित्रकलेच्या संस्कारांच्या स्पष्ट खुणा त्यांच्या या अभ्यासचित्रांत दिसत होत्या. गोपाळ देऊस्करांच्या या कलाशिक्षणकाळात अथपासून इतीपर्यंतच्या सर्व परीक्षांत त्यांना सदैव प्रथम क्रमांकावर ठेवणारी त्यांची उच्चकोटीची गुणवत्ता त्यांच्या या सर्व अभ्यासचित्रांतही डोकावत होती.

परंतु देऊस्करांची ती अभ्यासचित्रे पाहाताना मला आलेल्या दुसऱ्या एक अनुभवाने मी पुन्हा एकदा काहीसा मंत्रमुग्ध होण्याच्या बेतात आलो होतो. हा अनुभव होता त्या अभ्यासचित्रांच्या आसपास दरवळणाऱ्या मंद दृक्‌सुगंधाचा. हा दृक्‌सुगंध जरी काहीसा मंद वाटत होता तरी त्याचे संमोहित करणारे अस्सल उत्कट रूप खूप पूर्वी म्हणजे सुमारे

चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वीच मी अनुभवले होते. माझे स्वतःचे कलाशिक्षण सुरू होण्याच्या बेतात असतात माझ्या वडिलांच्या संग्रहातील 'सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट'चा एक जुना वार्षिक अहवाल मी पाहिला होता. पूर्वीच्या काळात उच्चकला परीक्षांत प्रथम क्रमांकात येणाऱ्या विद्यार्थ्यांची चित्रे अशा वार्षिक अहवालात छापण्याची 'सर जे.जे.स्कूल ऑफ आर्ट'ची प्रथा होती. मला वाटते की १९३१ च्या त्या वार्षिक अहवालात छापण्यात आलेल्या देऊस्करांच्या डिप्लोमाच्या अंतिम परीक्षेतील एका रचनाचित्राने या अस्सल आणि उत्कट दृक्सुगंधाची एक झुळूक माझ्यापर्यंत पोचवली होती आणि म्हणूनच देऊस्करांना या चित्राबद्दल सुवर्णपदक दिले गेल्याचे मी ऐकले त्या वेळी मला मुळीच आश्चर्य वाटले नव्हते.

नंतरच्या काळात अधूनमधून केव्हातरी छापले गेलेले देऊस्करांचे एखादे चित्र नजरेस पडावयाचे आणि पुन्हा त्या ओळखीच्या झालेल्या दृक्सुगंधाची फुंकर घालून जायचे. परंतु दृक्सुगंधाची एक वैशिष्ट्यपूर्ण कुपीच ज्यांना गवसली होती त्या गोपाळ देऊस्कर नामक अव्वल दर्जाच्या चित्रकाराची खरी ओळख मला झाली ती त्यांची पूर्ण झालेली मूळ चित्रे पाहून. मुंबईत भरलेल्या एक वार्षिक राज्य कलाप्रदर्शनात देऊस्करांच्या सन्मानार्थ निर्माण केलेल्या एका खास दालनात त्यांची काही मूळ चित्रे मांडण्यात आली होती. त्या मूळ चित्रांनी व त्यांतून जाणवणाऱ्या अस्सल नि उत्कट दृक्सुगंधाने मला नंतर कायमचेच अंकित केले. मला या संमोहित अवस्थेतही देऊस्कराच्या चित्रांनी नंतरच्या काळात काही धक्के जरूर दिले. परंतु या सुखद धक्क्यांनी मला जी जाग आली, त्या वेळी तोवर मला अज्ञात असलेले देऊस्करांचे काही कलागुण उजळून जाताना आढळले.

देऊस्करांची अव्वल दर्जाची व्यक्तिचित्रे माझ्या आता परिचयाची झाली होती. परंतु पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरातील बालगंधर्वांची ती दोन व्यक्तिचित्रे पाहून स्पष्टपणे जाणवली ती स्वतःच्याच पूर्णकर्तृत्वावर कळस चढवत जाण्याची देऊस्करांची प्रवृत्ती. बालगंधर्वांच्या या दोन अजोड व्यक्तिचित्रांनंतर निर्माण झालेले देऊस्करांचे महत्वाचे चित्र होते पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरातले भव्य आकाराच्या म्यूरलचे. भारतातील स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास जरी या रचनाचित्रात चित्रित केलेला असला तरी एक चित्रकार या नात्याने मला त्या चित्रात आढळले ते व्यक्तिचित्रणाचे विविध कळस आणि हे कळस उभे करत असताना देऊस्करांनी केलेली त्या कळसांना पोषक ठरणारी चित्रमांडणी.

चित्रकार गोपाळ देऊस्करांच्या या साऱ्या चित्रकर्तृत्वाचा आलेख हा चित्रकार या नात्याने स्वतःवर आलेली जबाबदारी ओळखणाऱ्या कलाकाराच्या कर्तृत्वाचा आलेख होता. त्यांनी मानलेली जबाबदारी होती स्वतःचे योगदान देण्याची. स्वतःची दृक्सुगंधाची कुपी सक्षम राखण्याची आणि स्वतःचेच नवे चित्रकळस निर्माण करण्याची. या जबाबदारीच्या जाणिवेमुळेच देऊस्करांना आपल्या निर्मितीसाठी परंपरेची मोडतोड कधीच करावी लागली नव्हती. कारण देऊस्करांनी जपलेली परंपरा होती रूपभेदाची. ही परंपरा होती रूपभेदातून स्वाभाविकपणे निर्माण होण्याऱ्या वास्तव-मिथक मिलाफाची आणि ही परंपरा होती तितक्याच स्वाभाविकपणे त्यांच्या चित्रांतून व्यक्त होणाऱ्या अमूर्त आशयाची. माझ्या दृष्टीने ही परंपरा होती दृक्सुगंधाच्या आनंदनिर्मितीची.


या परंपरेलाच स्वतः देऊस्कर चित्राच्या 'चौथ्या मितीची' परंपरा असे संबोधत असत.

याच परंपरेला व्हिसलर, पॉल गोगँ तसेच बोनार आणि व्हुयारसारख्या नव्या चित्रकारांनी दृक्संगीताची परंपरा मानले होते. याच परंपरेत डेगाने आपली भावस्पर्शी रेषा आणि जपानी कलेतील अवकाश-निर्मितीचे अंदाज यांचा मिलाफ घडवून व त्यासाठी स्वतंत्रपणे चिंतन करून नवे चित्रकळस उभे केले होते. डेगाच्या अशाच एका चित्रकळसाने एका अमेरिकेन तरुण चित्रकर्त्रीला विलक्षण अशी भुरळ घातली होती. मेरी कसाट हे तिचे नाव. चित्रकलेतील भरीव काही हाती लागेल. अशा आशेने युरोपात आलेली ही अमेरिकन चित्रकर्त्री तेथे सहा वर्षे वणवण भटकली आणि अपघाताने डेगाच्या त्या चित्रापाशी थबकली. दृक्सुगंधाच्या या परंपरेत, चित्राच्या 'चौथ्या मितीच्या' या परंपरेत 'दृक्संगीताच्या' या परंपरेत मेरी कसाटनंतर जबाबदारीची जाणीव ठेवून ज्या ज्या चित्रकारांनी आपले पहिले पाऊल ठेवले त्या त्या प्रत्येकाने दृक्सुगंधाच्या संचितात मोलाची भर घातली. ही भर पडत असताना जसा चित्रकलेतील ज्ञानेश्वर शोभणारा कन्डिन्स्की या परंपरेत निर्माण झाला तद्वतच रंग-रेषारूपी टाळमृदंगांच्या गजरात आयुष्यभर दीर्घकाळ तल्लीन झालेला नॉर्मन रॉकवेलसारखा श्रेष्ठ बोधचित्रकार पण निर्माण झाला.

अशा या थोर चित्रपरंपरेशी इमान राखणारे चित्रकार गोपाळ देऊस्कर एक माणूस म्हणून कसे होते याचा शोध घेताना काहींना त्यांचा शिवराळपणा अधिक महत्वाचा वाटला. आपल्या कार्यशैलीची रहस्ये जपताना ज्या फटकळ स्पष्टवक्तेपणाचा प्रसाद देऊस्कर काही जणांना देत असत तो कितपत बरोबर किंवा अयोग्य होता? सांगणे मोठे मुश्कील आहे. कारण सरतेशेवटी ज्याच्या त्याच्या अनुभवातूनच अशा गोष्टी घडत असतात.

माझ्यापुरते बोलावयाचे झाले तर गोपाळ देऊस्कर हे मला नेहमी एक दर्जेदार कलावंत म्हणून अधिक भावले. माझ्या व त्यांचा प्रत्यक्ष परिचय पण तसा अलिकडचाच. मी पुण्यास स्थलांतर केल्यानंतर तो खूप वाढला मात्र त्यांच्या आशीर्वादानेच. त्यामुळे कोणाला जवळ करावयाचे, कोणाला दूर ठेवायचे या बाबतीत अत्यंत काटेकोरपणे चिकित्सा करणाऱ्या देऊस्करांनी मी पुण्याला आल्यानंतर लागलीच ज्या वेळी मला फोन करून भेटीस बोलावले त्यावेळी मी काहीसा उडालोच. पण नंतर मात्र त्यांनी मला दिलेला वडिलकीच्या स्नेहाचा अनुभव हा मला नवी उभारी देणाराच ठरला.

माझी चित्रकलेची समज वाढवणाऱ्या दृक्सुगंधाच्या पुनर्नुभवाचे १९९५ हे चालू वर्ष आता लवकरच संपणार आहे. 'शिखरे रंग-रेषांची' या रविवार सकाळमधे प्रसिद्ध झालेल्या माझ्या लेखमालेने ज्या वर्षाची सुरूवात झाली, त्या वर्षाची सांगता करताना चित्राच्या 'चौथ्या मितीच्या' म्हणजेच दृक्सुगंधाच्या परंपरेबाबत जागरूक असलेल्या कै. गोपाळ देऊस्कर या थोर चित्रकाराविषयी चार शब्द लिहिण्याचा योग जुळून यावा हा योगायोग मला सांकेतिक अर्थाने महत्त्वाचा वाटतो.



*A large-scale mural at Pune's Tilak Smarak Mandir.*

# "The Creator of Painting's 4th Dimension!"

## Gopal Deuskar

- *Ravi Paranjape*

*Translation by Milind Agnihotri*

What does it mean – 'to know the art of painting?' In my view, it means 'to be aware of the visual aroma emerging from that painting.' There are many who learn how to paint, but how many of them are aware of this visual aroma? Not many, I believe. Because one rarely finds artists having such an awareness who are able to bring forth this visual aroma for art connoisseurs through their paintings. And, how does a student of painting develop this awareness? Just as the fragrance of a flower is devoid of any colour or form, a painting's visual aroma is a mystery even to a student of painting. So, imagine the plight of ordinary people on this subject!

Hence there is need to understand and explain the process of emergence of this visual aroma. For this, it is vital to recall past masters who have added to the reservoir of such visual aromas, to revisit their works, time and again. This process of 'journeying back' helps in understanding real traditions in paintings and in appreciating the difference between traditions and rituals. While traditions show a way-forward to an artist, rituals act as a handcuff. This is an important difference to be remembered.

As we try to discover the tradition of visual aromas in a painting, it is important to reiterate its undifferentiated nature, which sadly gets fragmented due to the un-called for argument between realistic and modern art as to which one is superior to the other. It is also important here to call out the 'cultural casteism' fed and nurtured by so called progressives when they label illustrations and illustrators as inferiors to classical paintings.



I got an opportunity to express these thoughts recently through 'Sakaal,' Pune's popular newspaper. January 1, 1995 was a Sunday. The 'Ravivaar Sakaal' edition of that day published the first article of my series titled, 'Shikhare Rangareshanchi.' Another twenty-five articles followed in this series, published every Sunday, till June 1995.

This article series covered twenty-six international painters who left deep impressions on me, those from an era of more than a century gone by, who helped in deepening my awareness on the subject of visual aromas in paintings. This heightened awareness was the real inspiration behind the article series. A process of re-experiencing these visual aromas accompanied the research which included study of works of these artists undertaken to write these articles. In the bargain, I witnessed multiple facets of the concept of visual aromas during those six months of writing the article series.

In those six months I was completely engulfed by the visual aromas and joy emanating from the paintings I studied. Old memories were rekindled. I remembered my three overseas travels had till then, where, as a man possessed, I had visited art galleries in Vienna, Paris, Amsterdam, London, New York, Philadelphia, Washington, Buffalo, Detroit and Toronto. I recalled the joy and peace felt after seeing paintings of my favorite artists, especially their original works, that gave me an experience of the inherent visual aromas.

I had termed 1995 as a 'renaissance year in visual aromas,' thanks to the wide welcome and recognition the series had received. Dedicating first six months of the year to writing, I decided to take a break and instead focus my attention for the remaining six months on my paintings only to realise that such man-made resolutions need an endorsement by fate, which has its own unsaid plans.

With just two months of the year remaining, just day before yesterday, fate intervened, and blew up my plans with a warning message which said – "I will not allow your renaissance year in visual aromas to end without you writing about at least one Indian artist."

It so happened that just around that




*"While seeing Deuskar's study paintings I*
*was intoxicated with*
*quite another experience*
*– a presence of subtle visual aromas in*
*those study paintings."*





time I had the fortune of receiving few study paintings of renowned artist Late Gopal Deuskar for safe keeping at my studio. The collection had some sketches as well as few portraits having a distinct mark of art lessons from Mumbai's Sir J. J. School of Arts, Royal Academy of London and few other prominent European Schools of Art. Highest level of skills and quality that always earned Gopal Deuskar a first rank during his student years came forth from these study paintings.

While seeing Deuskar's study paintings I was intoxicated with quite another experience – a presence of subtle visual aromas in those study paintings. Thanks to an old annual report of Sir J. J. School of Arts in my father's collection, I had first experienced this subtility about forty-forty five years back as I was starting my art education. During those years Sir J. J. School of Arts had a tradition to publish paintings of students who ranked first. I remember the 1931 annual report which published Deuskar's 'Pictorial Composition' from his final Diploma year that gave me a glimpse of this pure and intoxicating visual aroma. It didn't surprise me that this painting was awarded with a gold medal.

During subsequent years I came across few of Deuskar's paintings which occasionally got printed, that reminded me once again of that visual aroma. But my real introduction to this highly talented artist who seems to have discovered special facets of this visual aroma happened after I saw his completed original paintings. An exhibition held at Mumbai had a special section created in honour of Deuskar which displayed some of his original paintings. That left an indelible mark on me. I would later go on to discover more about him and his artistic talents through a series of surprises that awakened me.

I had now become familiar with the high-quality portraits done by Deuskar. But his two portraits of Balgandharva displayed at Pune's Balgandharva Rangamandir clearly indicated Deuskar's ability to take his work to the next level of completeness. These two immemorable portraits were followed by a large-scale mural at Pune's Tilak Smarak Mandir. Though it depicted a story of India's independence, as an

artist I could see the ultimate levels that can be achieved in portrait paintings and the arrangement of picture elements that Deuskar had done to achieve such levels.

The achievements of Artist Gopal Deuskar show a recognition of the immense responsibility that an artist carry. A responsibility towards making one's own contribution, to hold strong one's own sense of visual aroma and to establish one's own mark in the field. This sense of responsibility ensured Deuskar never broke ranks with traditions. In fact, he protected the tradition of achieving 'break-through's in form.' It was a tradition of bringing together myth and reality, a tradition of bringing forth the formless through a form. For me, it was a tradition of creating visual aroma and joy.

Deuskar termed this as a tradition of 'fourth dimension' in a painting. Whistler, Paul Gauguin, Bonnard and Vuillard called this as a tradition in visual music. Within this tradition Degas achieved new levels by bringing together his own sensitivity in lines and aspects of space creation adapted from Japanese art. Mary Cassatt, a young American artist was deeply inspired by Degas's style. With great hope and expectations this American artist came to Europe and ceaselessly toiled for six years till she accidentally came across Degas's work. In this tradition of visual aroma, a tradition of a painting's fourth dimension, a tradition of visual music, all those artists who took their first step after Mary Cassatt, added significantly to the reservoir of visual aroma. This tradition has seen Wassily Kandinsky, the pioneer in the field of paintings as well as Norman Rockwell, the renowned illustrator.

Artist Gopal Deuskar was a part of this great tradition. As a person some found him extremely harsh with words. Keeping his artistic style wrapped in mystery, whether Deuskar's forthrightness in speech was right or wrong, is debatable. All one can say is that such behaviors are deeply intertwined in one's own experiences.

I always found Gopal Deuskar as an artist of great repute. We have come to know each other only recently, a familiarity that has deepened after my shifting to Pune. Having clear norms of whom to meet and whom to stay away from, it surprised me when Deuskar called me to meet. The subsequent experience of his elderly affection towards me was deeply motivating.

1995, the 'renaissance year in visual aromas' has elevated my understanding of the art of painting and it will be ending soon. The year began with 'Shikare Rangreshanchi,' my article series that was published in Pune's Ravivaar Sakaal. And, the year is ending with an opportunity to write this article on Gopal Deuskar, the artist with an awareness of painting's 'fourth dimension' and its visual aromas. I find this coincidence symbolically important.



*His two portraits of Balgandharva displayed at Pune's Balgandharva Rangamandir clearly indicated Deuskar's ability to take his work to the next level of completeness.*







# गोपाळराव देउसकर
# एक अभिजात
# व्यक्तिचित्रकार

- श्रीकांत जाधव

जवळजवळ २२-२३ वर्षांपूर्वी पुण्यात एका थोर चित्रकाराचं आगमन झालं होतं. मुंबईतील प्रख्यात 'सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट'मधून शिक्षण संपवून लंडनमधील जगत् विख्यात 'रॉयल अकॅडमी ऑफ आर्ट' या संस्थेत अभ्यास करून परत भारतात येऊन संस्थानांमधून राजघराण्यातील व्यक्तींची चित्रे रंगवण्यात आपला बराचसा काळ व्यतीत झाल्यावर मुंबईत 'व्यावसायिक व्यक्तीचित्रकारा'ची प्रतिष्ठा लाभलेला हा चित्रकार. पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात लो. टिळकांच्या जीवनावर आधारित ५०X७ फूट अशा भव्य आकाराचे भित्तिचित्र रंगविण्यासाठी श्री. जयंतराव टिळक यांनी त्यांना पुण्यात आमंत्रित केलं होतं. हेच ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे थोर व्यक्तीचित्रकार श्री. गोपाळराव देउसकर!

मी त्यावेळस माझे पुण्यातील शालेय शिक्षण संपवून मुंबईत सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये पेंटिंग शिकत होतो. माझे वडील चित्रकार ग. ना. जाधव यांची मी लहानपणापासून जलरंगातील चित्रे पाहात असतानाच त्यांच्या संग्रहातील श्री. देउसकर यांनी जयपूरच्या राणी गायत्रीदेवी यांचे केलेले रंगीत छापील चित्र सतत पाहायचो. ते मला खूप आवडायचे. जे. जे. मध्ये शिकत असताना तैलरंग माध्यमाची श्रेष्ठता हळूहळू लक्षात येत होती. वडिलांचा श्री. देउसकरांशी परिचय असल्यामुळे त्यांच्याकडे स्केचिंगला जाण्याची संधी मिळाली. मी आणि माझा मित्र सुहास बहुळकर दर शनिवार-रविवार त्यांच्याकडे जाऊ लागलो. श्री. देउसकरांचे भित्तीचित्राचे काम चालू असतानाच त्यांनी फर्गसन कॉलेजसाठी नामवंत व्यक्तींची व्यक्तिचित्रे करण्याचे काम सुरु केले होते. या निमित्ताने ते शेवटपर्यंत पुण्यतच स्थायिक झाले. आम्हीही त्यांच्या हयातीत शेवटपर्यंत त्यांच्याकडे जायचो. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू लक्षात येत गेले. त्यांच्या चित्रांविषयी, तंत्राविषयी बऱ्याच गोष्टी संमजल्या.


टिळकांच्या जीवनावरील भित्तिचित्राचे काम चालू झाले त्यावेळस त्यांनी वयाची साठी ओलांडली होती. या वयातही त्यांची सातत्याने काम करण्याची उमेद, चिकाटी, वेळेत काम पूर्ण करण्याची जिद्द, त्यांच्या कामामधील कडक शिस्त, काटेकोरपणा खरोखरंच कौतुकास्पद होता. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत भारतातील कलाक्षेत्रात अनेक घडामोडी होत गेल्या.





भारतीय पारंपारिक चित्रशैलीतून वास्तववादी पाश्चिमात्य चित्रशैली ते आधुनिक चित्रशैली अशा या तांत्रिक आणि वैचारिक बदलांच्या कलाप्रवाहात न अडकता सुरुवातीपासून वास्तववादी व्यक्तिचित्रणाचाच ध्यास घेऊन त्यात श्री. देउसकर पूर्णपणे रमलेले होते.

त्यांचे भित्तिचित्राचे काम चालू असताना प्रत्यक्ष मॉडेलवरून केलेली रेखाटने पाहायला मिळाली. साध्या वर्तमानपत्रासारख्या कोऱ्या कागदावर ते निळ्या बॉलपेनचा वापर करून त्यात कधी निळी पेन्सिल किंवा काळी पेन्सिल शेडिंगसाठी वापरून स्केचेस करत. मानवी शरीररचनेचा सखोल अभ्यास असल्यामुळे मनुष्याकृतीच्या नाजूक बारकाव्यांनादेखील ते अगदी सहज सुंदरतेने रेषांत पकडत. त्यांच्या रेखाटनातून त्यांचे रेषेवरील प्रभुत्व लक्षात येई. त्यांच्याकडे स्केचिंग करत असताना ते अधून-मधून स्केच करायचे व मॉडेलला 'ग्रेसफुल पोज' कशी द्यायची हे सांगत आणि करूनही दाखवत. मॉडेलकडे पाहत असताना त्यातील प्राथमिक ढोबळ आकार शोधून आकारांची सुसंगती कशी ठेवायची, 'अँगल' कसा शोधायचा हे पाहायला मिळे आणि हे सर्व करत असताना मॉडेलची लय, 'ग्रेस' पकडण्याची कला त्यांच्याकडून शिकायला मिळाली. कधीतरी त्यांच्याकडून ते लंडनमधे असताना दिवसाचे १२-१२ तास कशा पध्दतीने स्केचिंग करत असत, हेही ऐकायला मिळे.



जे. जे. मधे शिकत असताना श्री. देउस्कर व्यक्तिचित्रणांची प्रात्यक्षिके दाखविण्यासाठी येत असत. त्यांची काम करण्याची पद्धत इतर चित्रकरांपेक्षा खूपच वेगळी होती. मॉडेलला पोझ देत असताना त्यामधे 'ग्रेस' कशी राहील इकडे ते लक्ष देत. ब्रशेस नेहमी स्वच्छ असत. पॅलेट पुसण्यासाठी व ब्रश साफ करायला तलम स्वच्छ पांढरा कपडा असे. पॅलेटवर रंग एका विशिष्ट 'लाइट टू डार्क' अशा पद्धतीने काढलेले असत. मॉडेल व इझल यांमधे कमीत कमी ७-८ फुटांचे अंतर असे. प्रकाशयोजना डाव्या बाजूने केलेली असे. कॅनव्हासवर काम करण्यापूर्वी काही वेळेस कॅनव्हासला लिन्सीड ऑइल फडक्याने लावून घेत. प्रत्यक्ष पेंटिंगला सुरूवात केल्यावर प्राथमिक रेषांसाठी यलो ऑकर रंगाचा वापर करीत. रंगलेपनाची पद्धत पारदर्शक पातळ रंगापासून अनेक छटा मिळवून 'हाय लाइट'साठी घट्ट रंगलेपन करत. हे सर्व करत असताना कुठल्याही प्रकारची घाईगडबड न करता अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने वेळेचे भान ठेवून प्रात्यक्षिक चाले. ठरावीक २५-३० मिनिटांनंतर मॉडेलला विश्रांती देत. प्रत्येक सिटींगमध्ये एक एक भाग पूर्ण

करण्याकडे त्यांचा कल असे. कधीही 'मूड' लागला म्हणून मॉडेलला जास्त वेळ बसवून काम केल्याचे आठवत नाही. विद्यार्थिदशेत हे सर्व पाहाताना गंमत वाटे. त्यांची प्रात्यक्षिके म्हणजे त्यांच्या तंत्रशैलीची एक झलक असे.

पुण्यात देउस्करांच्याकडे जात असताना ते 'व्यावसायिक व्यक्तिचित्रे' कशा पद्धतीने रंगवत हे कधीच दाखवत नसत. परंतु त्यांच्या सहवासात राहिल्यामुळे त्यांनी केलेली व्यक्तिचित्रे पाहायला मिळत. त्यांच्या चित्र काढण्याच्या पद्धतीचे कुतूहल वाटत असे. त्यांची वैशिष्ट्यपूर्ण अशी कामाची पद्धत होती की जी जे. जे. मध्ये आम्ही शिकत असताना कधीच शिकायला मिळाली नव्हती. अर्थात व्यावसायिक व्यक्तिचित्रणाचा प्रकारच वेगळा आहे. यामधे चित्रकारावर एक प्रकारचे बंधन असते. व्यक्तीचा हुबेहुबपणा महत्त्वाचा असतो. परंतु चित्र म्हणून त्यातील कलात्मक मूल्ये जपणे हे एक प्रकारे चित्रकाराचे कसबच असते. व्यक्ती जिवंत असताना समोर बसवून कॅनव्हासवर मोठ्या आकाराचे पूर्णाकृती चित्र रंगवणे हे खरोखरच कौशल्याचे काम आहे. त्यांनी संस्थानामधील राजघराण्यातील व्यक्तींच्या केलेल्या भव्य चित्रांच्या रंगीत छापील नकला किंवा रंगीत पारदर्शिका पाहात असताना त्यांच्या अप्रतिम कामाची कल्पना आल्यावाचून राहत नाही. त्यांच्या सहवासात राहून त्यांनी ही कामे कशा प्रकारे केली असतील हेही समजून चुकले. फर्गसन कॉलेजसाठी केलेल्या व्यक्तिचित्रांपैकी त्यांनी प्रत्यक्ष डॉ. श्रीराम लागू, पु.ल. देशपांडे अशा अनेक थोर व्यक्तींना आपल्या स्टुडिओत समोर बसवून व्यक्तिचित्रे केली आहेत.

एखादी व्यक्ती जिवंत नसेल किंवा मॉडेल म्हणून बसण्यास वेळ नसेल, अशा वेळेस चित्रकाराला छायाचित्राच्या आधारेच चित्र काढण्याशिवाय गत्यंतर नसते. चित्रकाराला हे एक आव्हानच असते. त्यात देउस्करांची चित्रशैली पाहून एक आश्चर्यच वाटते. फोटोला चौकटी, रेषा वगैरे मारून त्यांनी कॅनव्हासवर कधीच चित्र रेखाटले नाही. फोटोतील व्यक्तीसारखी चेहऱ्याची ठेवण असलेल्या व्यक्तीला शोधून, त्या





व्यक्तीला समोर बसवून कॅनव्हासवर चित्र काढत. हा हेड स्टडी असे. नंतरच त्या व्यक्तीचे मोठे चित्र पूर्ण होत असे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांनी केलेले लो. टिळकांचे २०X२० इंच आकारातील तैलरंगातील व्यक्तिचित्र. व्यक्तिचित्राचा हे चित्र एक अप्रतिम नमुना ठरावा. हे चित्र करण्यापूर्वी प्रथम त्यांनी श्री जयंतराव टिळकांचा हेड स्टडी करून घेतला होता. लो. टिळकांच्या चित्रात चेहऱ्यावरील करारी भाव, भेदक नजर आणि त्रिमित आभास अप्रतिम साधला आहे. या चित्रातील ब्रशचे जोमदार फटकारे, ठाशीव जोरकस रंगलेपन, तजेलदार रंगसंगती चित्र पाहाणाऱ्याला स्तिमित करते.

त्यांच्या आत्मविश्वासाची एक अविस्मरणीय आठवण आजही माझ्या मनात ताजी आहे. त्यांच्या घरी स्केचिंगला जात असताना, त्यांचे रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांच्या व्यक्तिचित्रणाचे काम चालू







होते. त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने प्रथम वेगळा हेड स्टडी करून, प्रत्यक्ष मॉडेलवरून कोट वगैरे पूर्ण केला होता. चेहरा फक्त फोटोवरून करून जवळजवळ पूर्ण झाला होता. आम्ही दुसऱ्या दिवशी त्यांच्याकडे गेल्यावर पाहातो तो काय, त्यांनी चित्रातला चेहरा पूर्णपणे खरडून पुसून टाकला होता. कारण काय, तर त्यांना तो आवडला नव्हता. परत तिसऱ्या दिवशी त्याच चित्रात अत्यंत आत्मविश्वासाने त्यांनी एक हुबेहूब चेहरा रंगवला होता. खरोखरच हे किती अवघड कसब आहे हे एक चित्रकारच जाणू शकतो.

देउस्करांची तैलरंगातील व्यक्तिचित्रे पाहात असताना प्रामुख्याने त्यांच्या चित्रातील मोहक रंगसंगती, रंगाचा तजेलदारपणा, टवटवीतपणा, रंगेलपनाची खास पद्धत, या सर्वांमुळे त्यांची स्वतंत्र अशी खास 'देअस्कर शैली' ओळखता येते. त्यांनी आपल्या काही चित्रांतून नैसर्गिक पार्श्वभूमीचा सुंदर उपयोग केलेला आढळून येतो. लो.टिळकांच्या चित्रातील उत्तुंग सह्याद्रीचा डोंगर, अफाट स्वच्छ आकाश, तसेच आगरकरांच्या चित्रातील पुण्यातील नैसर्गिक टेकडीचा परिसर व पोकळी निर्माण केलेली आढळून येते. चित्रातील प्रत्येक वस्तूचा पोत दाखवणे ही देउस्करांची खासियत. बालगंधर्वांच्या चित्रातील अंगरखा, पायांतील मखमली जोडे, स्त्रीभूमिकेतील नऊवारी साडी, त्यावरील जरी, गळ्यातील दागिने, हातांचा गुलाबी मऊपणा, बिपीनचंद्र पाल यांचे धोतर, त्यावरील चुण्या आचार्य अत्रे यांच्या चित्रातील चमकणारे दात अशा कित्येक गोष्टी त्यांनी आपल्या स्वतंत्रशैलीतून वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने दाखवल्या आहेत. कॅमेऱ्याने काढलेला रंगीत फोटो आणि त्याच व्यक्तीला बसवून कॅनव्हासवर रंगवलेले चित्र यांत जमीनअस्मानाचा फरक आहे हे त्यांची चित्रे पाहत असताना लक्षात आल्यावाचून राहत नाही. त्यांच्या चित्रातील ब्रशचे फटकारे एकमेकांत गुंतत जातात आणि प्रत्ययकारी घनता निर्माण करतात. जणू काही एखादा शिल्पकार मातीमधून व्यक्तिशिल्प बनवताना जसा चेहऱ्याच्या

उंचसखल भागाप्रमाणे मातीचे थर लावून मोल्डिंग करतो, अगदी त्याच पद्धतीने देउस्करांनी आपल्या चित्रात द्विमित सपाट पृष्ठभागावर त्रिमित घनाकृतीचा आभास अप्रतिम साधला आहे. त्यांच्या चित्रातील रंगछटा अत्यंत संवेद्य आहेत.

त्यांचा स्टूडिओ नेहमी स्वच्छ असे. चित्रे नीट ठेवण्यासाठी खास करून घेतलेल्या लाकडी रॅक्स असत. डाव्या बाजूने प्रकाशयोजना करण्यासाठी खिडकीच्या वर चार ट्यूबलाइट्स लावलेल्या होत्या. इझल आणि मॉडेलची बसण्याची जागा यांमध्ये ठरावीक अंतर असे. देउस्करांनी आयुष्यभर सातत्याने व्यावसायिक व्यक्तिचित्रणे करत असताना, आपण काढलेले चित्र पाहाणाऱ्याला हुबेहुब त्या व्यक्तीचेच आहे असे वाटले तरी त्यात नुसताच छायाचित्रात्मक हुबेहुबपणा न आणता रंगसंगती, रंगालेपन, पोत, रचना, पार्श्वभूमी इत्यादी घटकांतून कलात्मक मूल्ये सहज व स्वाभाविकपणे प्रत्ययाला आणून देण्याचा त्यांचा प्रयत्न असे. त्यांची काढलेली व रंगवलेली व्यक्तिचित्रेही कलात्मक तर आहेतच, पण चित्रकलेच्या विद्यार्थ्याला ती खास अभ्यासण्याजोगीही आहेत. कलेचा प्रत्यक्षानुभव घेणे आणि सौंदर्याचा आनंद भोगणे हा एक अपूर्व अनुभव असतो. गोपाळराव देउस्करांची व्यक्तिचित्रे त्याची खरीखुरी साक्ष पटवतात.





# Painter Goaplrao Deuskar

# A Classic Artist

*- Shreekant Jadhav*

*English Translation : Sanika Godbole*



About 22 or 23 years ago, Pune saw the arrival of a great artist. A graduate from the renowned Sir J.J. School of Art in Mumbai, Gopalrao Deuskar went on to train in London, at the internationally respected Royal Academy of Art, after which he returned to India and invested his time in painting portraits of members from the countless royal families of the principalities of India. On his return to Mumbai, he became known as an acclaimed portrait artist. An internationally admired artist, Deuskar was commissioned by Jayantrao Tilak to create a massive 50 ft. by 7 ft. mural depicting Lokmanya Tilak's life for the Tilak Smarak Mandir in Pune.

At the time, I was an art student learning painting at the Sir J.J. School of Art. My father, G. N. Jadhav, a watercolour artist himself, owned a print of one of Deuskar's portraits, which depicted Maharani Gayatri Devi of Jaipur. This portrait became very dear to my heart.

While at the Sir J. J. School of Art, I became fascinated by the qualities of oil paints, and began to understand their versatility. I was lucky enough to have been able to use my father's friendship with Deuskar to learn sketching from the man himself, and my friend Suhas Bahulkar and I would go to him every weekend.

During his time creating the large mural at the Tilak Smarak Mandir, he had also been commissioned by Fergusson College in Pune to paint portraits of renowned figures in history, due to which Deuskar remained in Pune until his passing. As I was fortunate enough to make his acquaintance, I was able to

spend time with him, understand his techniques, his personality and his art. Deuskar had begun the mural at Tilak Smarak, he had already passed the age of sixty, and his energy, dedication to his work, his commitment to finishing his project on time, his strict discipline and his detail-oriented approach was inspiring.

Before, during and after the British occupation of India, the landscape of the creative arts in India went through many changes. Despite the art-scape in India going from Indian traditional styles, to realistic Western-influenced art, to modern art, Deuskar remained committed to depicting portraits in a realist style and was not swayed by the changes that occurred around him. I was able to see him work with real-life models during his time working on the Tilak mural, and to see him sketching on regular newsprint paper with simple ball pens, black and blue pencils for shading was incredible. Having studied human anatomy, he was able to capture even the slightest detail in the human body. Watching him sketch, I was fascinated by his mastery over lines, and during my time learning from him, I was able to observe his interactions with the models, and how he would direct and even demonstrate how to take graceful poses. Working with live models under Deuskar's guidance gave me the ability to not just secure the general form and size of the subject, but to capture the grace and rhythm of the subject. Sometimes, Deuskar would tell us stories of his time in London, about the hours and hours spent sketching.

Deuskar would also come to the Sir J.J. School of Art to conduct demonstrations on portraiture. His methods were vastly different from his contemporaries. He would make it a point to give his subject a very graceful pose. He was also very specific about his work environment. His brushes were always clean, his spare rags spotless, and his organisation of colours on the palette would always go from the lightest to the darkest shades. His distance from the model was usually about seven to eight feet, and his light source was always to his left. Sometimes, he would apply linseed oil to the canvas before he began, and once he began the preliminary block-in, he would use yellow ochre to mark out the lines and forms. His method of paint layering always started with the most transparent colours and would progress to the thicker paints for highlights. He was always very conscientious about his work, unhurried but always keeping the time in mind. Every half an hour or so, he would give the model a chance to relax, and each sitting was dedicated to a specific part of the portrait. He would never stretch the model to their limits, no matter how focused he was. His demonstrations were a captivating insight into his techniques, and his guest practical lectures were a constant source of new knowledge and fascination. His private studio too was always immaculate, and he had had special racks made to dry his paintings. During my time visiting him in Pune, he would make it a point to never show us how he worked on his commissions, however the time we spent with him gave us a unique insight into Deuskar as a professional artist, which we would not have been able to see through his demonstrations alone. Working on commissions limits the artist in a way, however it is the ability to demonstrate their skill and finesse despite these constraints that truly shows the artist's talent. With portraiture, the commission dictates that the subject be painted in the most accurate way possible, however, to be able to do this while also creating a beautiful work of art truly demonstrates the artist's expertise. To paint a live subject on a

large canvas is on another level of skill. Prints and slides of his portrayals of members of the royal families of various principalities are truly astonishing to behold. As I was fortunate enough to spend some time with him, I was able to somewhat understand how Deuskar's methods and techniques. While working on his commission for Fergusson College, he painted portraits of legends such as Dr. Shriram Lagu and P.L. Deshpande face to face by inviting them to sit for their portraits in his studio.

When a person has passed away, or if they do not have the time to come in and sit for their portrait, the artist has no choice but to work off photographs, which can be challenging. Deuskar did not draw up girds or mark off parts of the photograph to make it easier to replicate onto the canvas, rather he would try to find a person in real life who resembled the person being painted and get them to pose like the photograph for his portraits. This is known as a 'head study', after which he would use that as a reference for the larger portrait. An excellent example of this technique is the 20 X 20 oil painting of Lokmanya Tilak, for which he used his grandson Jayantrao Tilak as his person of reference. Deuskar's expertise has made the portrait almost three-dimensional, and his 'head study' technique made it possible for him to capture Tilak's fiery determination and his soul-piercing gaze. Those viewing the painting are stunned by the bold brush strokes and the vivid, luminous colour scheme.

Deuskar's self-confidence was inspiring. I distinctly remember an occasion while I was going to learn from him, he was working on the portrait of the governor of the Reserve Bank of India. As usual, he had created his 'head study' first and was using that to begin the larger portrait. While my friend and I were there one day, he had almost finished the face on the larger portrait using the photo as a reference, but when we returned the next day, to our shock, he had completely scratched the paint claiming that he was not happy with it. To our surprise when we came back the day after that, he had painted an entirely new face which was identical to the one in the photo. Only an artist would understand how difficult such a task must have been.

Deuskar has become most known for the beautiful and vibrant colours in his oil paintings, along with his way of layering the pigments, all of which has created a distinct 'Deuskar style'. Some of his paintings have beautifully depicted scenes from natural landscapes as backgrounds. His portrait of Tilak features the vast, unbroken sky above the towering beauty of the Sahyadri mountains, while his portrait of Agarkar details the hills surrounding Pune. Deuskar also had a talent for capturing the textures of everything in the portrait. His portraits of Bal Gandharva have the most precise emphasis placed on the textures of the angarkha coat, the velvet of his slippers, the silk and brocade of the nine-yard sari, the jewellery, and the soft, delicate hands. The folds of Bipin Chandra Pal's dhoti, and the sparkle of Acharya Atre's toothy smile are just a few of the minute details captured in Deuskar's work. One can't help but realise that Deuskar's portraits and a coloured photograph of the same person are as different as night and day. His brush strokes weave into one another and create a level of realistic depth and volume in the portrait. Like a sculptor might use extra layers of clay to emphasise the high points on a sculpture's face, Deuskar is able to beautifully create an illusion of three-dimensionality on a flat, two-dimensional surface. His use of colour and shade are extremely evocative.

Throughout his life, whenever he was working on commissioned portraits, even though the exact likeness of the subject was captured, his portraits did not have the lifeless exactitude of a photograph. Rather, his use of colour schemes, texture, composition, background, and other artistic values were reflected in his work with an effortless ease. While being objectively beautiful to look at, his work is also worth studying from a technical point of view, especially for art students. Art and beauty are capable of imparting a unique experience. This is evident in Gopalrao Deuskar's portraits.



# द रवी परांजपे फाउंडेशनचा वृत्तांत

दिवाळी पाडव्याच्या दिवशी 'The Ravi Paranjape art gallery' मध्ये ४.३० वाजता 'भारत' काल- आज- उद्या ह्या पुस्तकाचे अनावरण झाले. आर्टिस्ट 'श्री रवि परांजपे' ह्यांजकडून पुन्हश्च एक अप्रतिम कलाकृती पुस्तकाच्या स्वरूपात आपल्या भेटीस आली आहे. ह्या सोहळ्यास 'द रवि परांजपे फौंडेशनचे ' सर्व बोर्ड मेंबर्स उपस्थित होते. सौ आशा अग्निहोत्री ह्यांनी कार्यक्रमाची सुरवात केली व नंतर श्री मिलिंद अग्निहोत्री ह्यांनी सूत्रसंचलन केले .श्री सतीश गोरे ह्यांनी उत्तम प्रकारे पुस्तकावर सविस्तर विवेचन केले . श्री सुनील गोकर्ण ह्यांनी ह्या पुस्तकाच्या e-book मुद्रणाची सर्व धुरा श्री संजय लोपेझ ह्याच्या सहकार्याने कशी सांभाळली ह्याबद्दल सांगितले . त्यामुळेच द रवि परांजपे फौंडेशनचे पहिले e-book इतक्या कमी वेळात प्रकाशित करता आले. श्री मिलिंद व आशा अग्निहोत्री , सौ दीपा गोरे , श्री राहुल व सौ तृप्ती देशपांडे आणि सौ स्मिताताई परांजपे ह्यांनी पुस्तकां संबंधी आपली मनोगते व्यक्त केली , फाऊंडेशनचे भविष्यातील उपक्रम ह्याबद्दल माहिती दिली. फौंडेशन तर्फे ह्यापुढे 'आर्टिस्ट श्री रवि परांजपे' ह्यांची पूर्वी प्रसिद्ध झालेली पुस्तकेही आता दर महिन्याला एक ह्या प्रमाणे ई-बुक स्वरुपात अत्यंत वाजवी दरात उपलब्ध करण्यात येणार आहेत.

अखेर आर्टिस्ट श्री रवि परांजपे ह्यांनी त्यांचे ह्या पुस्तक लिहिण्यामागचे उद्दिष्ट्य सांगितले व मनोगत व्यक्त केले. हे पुस्तक अनेक लेखांचे सादरीकरण असून काळाप्रमाणे बदलेले विचार व त्याच्या अनुषंगाने केलेले बैयक्तिक व सामाजिक पातळीवरील कृती बदल ह्यांची सुंदर गुंफण आहे. आताच्या तरुण पिढीला सध्याच्या परिस्थितीत नक्कीच मार्गदर्शक ठरणारे उत्तम दर्जाचे पुस्तक ही आत्ताच्या काळात पर्वणीच आहे. सर्वांनी जरूर पुस्तक खरेदी करून लाभ घ्यावा हे नक्की.

अतिशय सुटसुटीत पद्धतीने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सरकारी नियमावली प्रमाणे मोजक्या मंडळींच्या उपस्थितीत अतिशय सुंदर सोहळा संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाची क्षणचित्रे व चित्रफीत लवकरच यू ट्यूब वर उपलब्ध होईलच.

'भारत' काल- आज- उद्या हे पुस्तक केवळ रुपये १५०/- इतक्या कमी शुल्कात e-book माध्यमात उपलब्ध केले आहे .कारण 'आर्टिस्ट श्री रवि परांजपे ' ह्यांचे विचार सर्वदुरपर्यंत पोचविणे हा ह्या मागचा एकमेव उद्देश डोळ्यांसमोर ठेवून आपल्या भेटीस आणले आहे.

आमच्या www.theraviparanjapestudio.com ह्या वेबसाईट ला त्वरित भेट द्या आणि आपली पुस्तकाची कॉपी लगेचच ऑर्डर करा.

**फौंडेशन तर्फे घेण्यात येणाऱ्या painting competition प्रवेशिका पाठवण्याची अंतिम तारीख 15डिसेंबर 2020 आहे. तेव्हा आपल्या प्रवेशिका वेळीच पाठवा.**

**सौ आशा अग्निहोत्री**
**(द रवी परांजपे फाऊंडेशनतर्फे)**

# 'The Ravi Paranjape Foundation's past and future activities

On the day of Diwali Padva, the e- book 'Bharat' kaal-aaj- udya was unveiled at 'The Ravi Paranjape Art Gallery' at 4.30 pm. Artist 'Shri Ravi Paranjape' has once again presented this amazing e- book touching and discussing many social, cultural, political issues .

The ceremony was attended by all the board members of The Ravi Paranjape Foundation. Mrs. Asha Agnihotri started the program and then Mr. Milind Agnihotri conducted the program. Mr. Satish Gore spoke about the book lucidly and shared the highlights.Mr. Sunil Gokarna explained how the entire e- book making was done by him and Mr. Sanjay Lopez. This is the first e-book by 'The Ravi Paranjape Foundation' . Mr. Milind and Asha Agnihotri, Mrs. Deepa Gore, Mr. Rahul and Mrs. Tripti Deshpande and Mrs. Smitatai Paranjape expressed their views about the book and also informed about the future activities of the Foundation.

Very simple ceremony was held in the presence of few people and all covid norms were followed with utmost care.Highlights and videos of the event will be soon available on YouTube.


The book 'Bharat' kaal-aaj-udya has been made available in e-book format for only Rs.150 / - The sole purpose to offer this book at such affordable price is mainly to convey the thoughts of 'Artist Shri Ravi Paranjape' to all.

To buy this book please visit our website and order a copy of your book immediately. Our website address...

www.theraviparanjapestudio.com

**Other important reminder for all of you that we have already announced painting competition for everyone above age 18. I am sure you all have seen details about the competition time to time. Kindly do not forget the last date for submission of entries as 15th December 2020. Please send your entry on time.**

*Mrs.Asha Agnihotri*
*(The Ravi Paranjape Foundation)*




*Compliments from*
*RAVI PARANJAPE FOUNDATION FOR ART, Pune*

*For latest events please visit : https://www.facebook.com/theraviparanjapestudio*
*Email: abhijatkala@gmail.com*